पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शहर सुधारणा समिति

**कार्यपत्रिका क्रमांक - ३**

सभावृत्तांत

दिनांक - २०/०८/२०१४ वेळ - दुपारी ३.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **२०/०८/२०१४** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.छाया जगन्नाथ साबळे - सभापती**
२. मा.आर.एस.कुमार
३. मा.नेटके सुमन राजेंद्र
४. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
५. मा.जवळकर वैशाली राहुल
६. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.गावडे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.ऐवले - प्र.समाज विकास अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

उपस्थित सन्मा.सदस्य यांचे मान्यतेने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.

**विषय क्र.३)** झोपडी दि.०१/०१/२००० अथवा त्यापूर्वीपासूनची संरक्षणपात्र असल्याचे ठरविण्याबाबत तसेच त्यात प्रत्यक्ष राहणा-या झोपडीवासियांचा निवारा निश्चित करण्याबाबत...

**विषय क्र.४)** झोपडपट्टीचे पुनर्वसन करणेबाबत - मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

**विषय क्र.५)** महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २०५ अन्वये रस्ता घोषित करणेबाबत - मा.आशा सुर्यवंशी, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव.

----------

दिनांक **०६/०८/२०१४ व ११/०८/२०१४** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमाक २)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - १५ विषय क्रमांक - १

दिनांक - २०/०८/२०१४

सुचक - मा.सुमन नेटके अनुमोदक - मा.अश्विनी चिंचवडे

संदर्भ : १) मा.चारुशिला कुटे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

विषय - आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाच्या मंजूर योजनेनुसार आकुर्डी येथील सर्वे नं.३५/३/१ पैकी सुमारे ५० आर क्षेत्र आरक्षण क्र.५४८ नुसार प्राथमिक शाळेसाठी आरक्षित ठेवण्यात आलेले असल्याने फेरबदलाची कार्यवाही करुन सदरचा प्रस्ताव शासनास सादर करणेबाबत.....

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १६ विषय क्रमांक - २

दिनांक - २०/०८/२०१४ विभाग - अ प्रभाग कार्यालय

सुचक - मा.वैशाली जवळकर अनुमोदक - मा.सुमन नेटके

संदर्भ : १) मा.प्रशासन अधिकारी यांचेकडील पत्र क्र.अप्र/११/कावि/२४/२०१४, दि.१५/०१/२०१४

२) मा.अ प्रभाग समिती ठराव क्रमांक २२०, दिनांक ०८/०१/२०१४

विषय - पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाने सन १९९५ च्या विकास आराखडयानुसार आकुर्डी येथील स.नं.३५/३/१ पैकी सुमारे ५० आर क्षेत्र आरक्षण क्र.५४८ नुसार प्राथमिक शाळेसाठी आरक्षित ठेवण्यात आले आहे. १८ गुंठे रिकाम्या जागेचे भूसंपादन प्रक्रीया सुरु करणेस व ज्या जागेमध्ये बांधकामे झालेली आहेत ती जागा आरक्षणामधून वगळणेबाबत....

विषय क्रमांक २ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - १७ विषय क्रमांक - ३

दिनांक - २०/०८/२०१४ विभाग - झो.नि.पु.

सुचक - मा.आर.एस.कुमार अनुमोदक - मा.सुमन नेटके

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.झोनिपु/३/कावि/३४२/२०१४, दि.१६/०८/२०१४

मा.महापालिका आयुक्त यांचे शिफारशीप्रमाणे -

महाराष्ट्र शासनाने दि.२ मे २०१४ रोजी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) अधिनियम २०१४ पारित केला आहे. सदर अधिनिमाद्वारे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत. उपरोक्त अधिनियमातील दुरुस्तीस अनुसरुन गृहनिर्माण विभागामार्फत क्र.झोपुयो-१००१/प्र.क्र.१२५/१४/झोपसु-१ दि.२२ जुलै २०१४ अन्वये शासन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. सदर दुरुस्त्या व त्यानुषंगाने दि.२२ जुलै २०१४ रोजी पारित झालेल्या शासन निर्णयातील

ठळक बाबी पुढील प्रमाणे आहेत. १) झोपडी दि.०१/०१/२००० अथवा त्यापूर्वीपासूनची संरक्षणप्राप्त असल्याचे ठरविण्याबाबत तसेच त्यात प्रत्यक्ष राहणा-या झोपडी वासियांचा निवारा निश्चित करणे. २) सध्या अस्तित्वात असलेली झोपडी दि.०१/०१/२००० रोजी अथवा त्यापूर्वीपासूनची असणे आवश्यक असलेने त्याबाबतच्या तपासणीकरीता आणि त्या झोपडीत प्रत्यक्ष राहणा-या झोपडीवासींयाचा निवारा निश्चित करण्याच्या कागदपत्रांच्या / अभिलेखाच्या यादीत व कार्यपध्दतीत सुधारणा करणे, ३) दि.०१/०१/२००० रोजी अस्तित्वात असलेल्या झोपडीत राहणा-या संरक्षणपात्र झोपडीवासियांचे महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) अधिनियम १९७१ मधील कलम ३ झेड खाली पुनर्वसन व पुन:स्थाननिश्चयन संदर्भात निदेश देणे. तरी उपरोक्त दि. २ मे २०१४ रोजीचा महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) अधिनियम २०१४ व त्यानुषंगाने पारित झालेला दि.२२ जुलै २०१४ चा शासन निर्णय मा.महापालिका सभेपुढे अवलोकनार्थ ठेवणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १८ विषय क्रमांक - ४

दिनांक - २०/०८/२०१४

सुचक - मा.सुमन नेटके अनुमोदक - मा.वैशाली जवळकर

संदर्भ : मा.सुमन नेटके, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव -

पिंपरी येथील भाटनगर पुनर्वसन प्रकल्प महानगरपालिकेमार्फत राबविण्यात आला. त्याअंतर्गत झोपडपट्टीधारकांना १८० चौ.फुट बहुउद्देशिय खोली देण्यात आलेली आहे. प्रकल्पातील इमारती ब-याच प्रमाणात नादुरुस्त झालेल्या असून मोडकळीस आलेल्या आहेत. तसेच सदर प्रकल्पा जवळील बौध्दनगर, भाटनगर, रमाबाईनगर, भिमनगर, आंबेडकर कॉलनी, एमआयडीसी (बौध्दनगर), इ. झोपडपट्टीचे पुनर्वसन करणे गरजेचे आहे. या सर्व बाबींचा विचार करता भाटनगर पुनर्वसन प्रकल्पातील सर्व इमारती पाडून तेथे SRA (झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड ) मार्फत नव्याने इमारती बांधणेकामी कार्यवाही करणेस मान्यता देणेबाबत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - १९ विषय क्रमांक - ५

दिनांक - २०/०८/२०१४

सुचक - मा.आशा सुर्यवंशी अनुमोदक - मा.वैशाली जवळकर

संदर्भ : मा.आशा सुर्यवंशी, मा.वैशाली जवळकर यांचा प्रस्ताव -

प्रभाग क्र.२८ मासुळकर कॉलनी डब्लू सेक्टर ते मोरवाडी पर्यंत महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २०५ अन्वये १२ मीटर रुंदीचा रस्ता विकसीत करावा अशी प्रभागातील सर्व नागरिकांची पर्यायी रस्ता असावा म्हणून सतत मागणी होत आहे. मासुळकर कॉलनी हा प्रभाग सतत लोकसंखेने वाढत असलेला परिसर आहे. या ठिकाणी नेहरुनगर ०

बॉईज, रसरंग चौक पासून म्हाडा कॉलनी पासून मोरवाडी येथे जाणार रस्ता आहे. या रस्त्यावर खूप वाहतूक असलेने व नागरिकांचा येण्याजाण्याचा वापर होत असलेने सतत गजबजलेला असतो त्यामुळे अपघात होत असतात. या रस्त्याला पर्यायी रस्ता टेल्को कॉलनी लगतचा पुढे डब्लू सेक्टर ते मोरवाडी असा तयार केल्यास या भागातील गाडयांची गर्दी कमी होऊन पर्यायी रस्त्याने जाऊ शकतात. त्यामुळे सदर प्रभाग २८ मासुळकर कॉलनी डब्लू सेक्टर ते मोरवाडी पर्यंतचा १२ मीटर रस्ता महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम २०५ अन्वये घोषित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **छाया जगन्नाथ साबळे** )
**सभापती**
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/७०४/२०१४
दिनांक : २०/०८/२०१४



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.